राष्ट्रीय आरोग्य अभियान, नाशिक
कंत्राटी पध्दतीने पदे भरणेकरीता जाहीरात

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नाशिक अंतर्गत खालील पदे कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाची आहेत. तरी खालील पदे भरणेकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | वय मर्यादा | एकूण पद संख्या (आरक्षणासहित) | एकत्रित मानधन (प्रतिमाह रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समुह संघटक | एम.एस.डब्ल्यु | ५ वर्ष संबंधित कामाचा अनुभव (आरोग्य/ सामाजिक क्षेत्रात संबधित कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य) | खुला प्रवर्गासाठी ३८ वर्ष तसेच मागासवर्गीयांसाठी ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावे. | एकूण पदे – ०१<br>खुला(Open) – १ | रु. १२,५००/- |
| २ | शित साखळी तंत्रज्ञ | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा ( १० वी उत्तीर्ण )<br>तांत्रिक अर्हता :-<br>१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे यांत्रिकी/विदयुत/अभियांत्रिकी शाखेतील ३ वर्षीय पदवीका उत्तीर्ण.<br>किंवा<br>शासकिय औदयोगिक शिक्षण संस्थेमधील प्रशितन व वातानुकुलीकरण २ वर्षाचा ट्रेड उत्तीर्ण<br>आणि<br>एन.सी.टी.व्ही.टी प्रमाणपत्र धारक असावा, एम.एस.सी.आय.टी प्रमाणपत्र आवश्यक, चारचाकी वाहन चालवण्याचा परवाणा असल्यास प्राधान्य | पदवीकासाठी किमान २ वर्षाचा अनुभव,<br>आय.टी.आय. साठी किमान ३ वर्षाचा अनुभव | खुला प्रवर्गासाठी ३८ वर्ष तसेच मागासवर्गीयांसाठी ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावे. | एकूण पदे – ०१<br>खुला(Open) – १ | रु. १२,०००/- |

अटी व शर्ती –

१) सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन एकत्रीत मानधन तत्वावर आहेत. सदर पदे शासनाची नसुन सदर पदावर काम केले म्हणुन शासकीय नोकरीत हक्क राहणार नाही.
२) कंत्राटी पद भरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो. निवड प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/रद्द करणे/अशंतः बदल करणे याचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.
३) अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाची छाननी केली जाईल व पात्र उमेदवारांना लेखी परिक्षा अथवा तोंडी मुलाखतीसाठीची दिनांक, वेळ व ठिकाण हे कळविण्यात येईल.
४) केंद्र व राज्य शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.
५) सदर पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात संपुर्ण नांव, पत्ता फोटो, जन्मतारीख लिहून सादर करावी. जन्म दाखल्याचा पुरावा, जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, सर्व मूळ गुणपत्रके(वर्षनिहाय) व अनुभवाचे प्रमाणपत्र सांक्षाकीत कागदपत्रांसह दिनांक –१६/१२/२०१७ पर्यंत सायं. ०५.०० वाजेपर्यंत जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक येथे सादर करावेत.

Sd/-
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

Sd/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक